## ई भूमिती प्रणाली जिल्ह्यातील जमीन व्यवस्थापनात पारदर्शकता, अचूकता आणि कार्यक्षमतेस चालना देत असून, भविष्यातील नियोजन

# संसाधनांचा योग्य वापर आणि नागरिकांना वेगवान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी उपयुक्त : जिल्हाधिकारी

■अकोला,दि २५(प्रतिनिधी) :

जिल्ह्यातील शासकीय जमिनी व मालमत्ता यांचे डिजिटायझेशन आणि प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाद्वारे 'ई-भूमिती' ही अत्याधुनिक जीआयएस आधारित 'डिजिटल गव्हर्नमेंट लँड ॲसेट मॅपिंग अँड मॉनिटरिंग सिस्टम' यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आली असून १२ हजार हे. शासकीय जमिनींचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.

या अभिनव उपक्रमांतर्गत ग्राम महसुल अधिकारी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन जमिनींची माहिती मालमत्तेचे नाव, सर्वे नंबर, क्षेत्रफळ,



स्थान निर्देशांक, छायाचित्र ही माहिती प्रणालीवर नोंदवितात. मंडळ अधिकारी तपासणी करून ती माहिती प्रमाणित करतात, तर जिल्हाधिकारी स्तरावर संपूर्ण जिल्ह्याचे विश्लेषण, अहवाल व आकडेवारी सहज उपलब्ध होते. तसेच सार्वजनिक पोर्टलवर नागरिकांना मंजूर जमिनींची माहिती नकाशाच्या स्वरूपात पाहण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.

आजपर्यंत या प्रणालीच्या माध्यमातून एकूण १२ हजार हेक्टर शासकीय जमिनींची माहिती यशस्वीरित्या अपलोड करण्यात आली असून, जिल्ह्यातील शासकीय जमिनींचे डिजिटल नोंदणीकरण व निरीक्षण करण्याच्या दिशेने हा एक मोठा टप्पा ठरला आहे.

## शकुंतलाच्या फाटकावरील पोल ठरला तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत



**अकोला** : जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात भीषण अपघात घडला. ब्रिटिश कालीन ऐतिहासिक वारसा असलेली आणि आज हळूहळू आपल्या अस्तित्वाच्या शेवटच्या श्वासात पोहोचलेली शकुंतला रेल्वे केवळ दुर्लक्षित नाही तर धोकादायकही ठरत आहे. जितापुर-मूर्तिजापूर मार्गावरील या बंद पडलेल्या रेल्वे फाटकाच्या पोलवर भरधाव दुचाकी जोरदार आदळली. यात सूरज देवीदास खंडारे (१९, रा. पंचशील नगर) हा तरुण जागीच ठार झाला.या प्रकरणी संदेश वामनराव चौरपगार यांच्या फिर्यादीवरून मूर्तिजापूर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अजित जाधव यांच्या नेतृत्वात तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या (एसटी महामंडळ) नवरात्र विशेष देवी दर्शन टुर्सला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीसह विशेष पॅकेज; एसटी महामंडळाचा उपक्रम लोकप्रिय

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी महामंडळ) यांच्यावतीने भाविकांसाठी विशेष 'देवी दर्शन टुर्स'ची आकर्षक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमाला महिला भाविकांचा विशेष प्रतिसाद लाभत असून, अकोला व अमरावती जिल्ह्यातील शक्तीपीठांचे दर्शन आता सवलतीच्या दरात करता येत असल्यामुळे ही सेवा लोकप्रिय ठरतेय.गेल्या सोमवारी घटस्थापनेने नवरात्र उत्सवाचा शुभारंभ झाला. हिंदू धर्मातील हा एक अत्यंत पवित्र आणि भक्तिभावाने भरलेला उत्सव मानला जातो. नऊ दिवसांच्या या उत्सवात विविध शक्तीच्या रूपांची उपासना केली जाते. या काळात देवी मंदिरांमध्ये विशेष पूजन आणि यात्रा यांचे आयोजन केले जाते. त्यामुळे नवरात्रात देवी दर्शनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.ही गरज लक्षात घेऊन एसटी महामंडळाने भाविकांना सोयीस्कर व परवडणाऱ्या टुर्सद्वारे शक्तीपीठांचे दर्शन घेता यावे यासाठी २२ सप्टेंबरपासून १ ऑक्टोबरपर्यंत नवरात्र विशेष टुर्स सेवा सुरू केली आहे.

**दोन टप्प्यात विशेष टुर्स**

अकोला जिल्हा देवी दर्शन टुर्स पॅकेज या पॅकेजअंतर्गत बाळापुर (बाळादेवी), पातुर (रेणुकादेवी), चिंचोली (रुद्रायणी देवी), बार्शिटाकळी (कालंका माता), दोनद (आसरा माता), काटेपूर्णा (ढगा देवी) या ठिकाणांची यात्रा करता येणार आहे.

या पूर्ण दर्शन पॅकेजचे भाडे सामान्य प्रवाशांसाठी ३०३ असून, महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसाठी केवळ १५२ इतके सवलतीचे दर लागू करण्यात आले आहेत.

**अमरावती जिल्हा देवी दर्शन टुर्स पॅकेज**

दुसऱ्या टुर्समध्ये मुहादेवी, अंबादेवी (अमरावती) आणि काटेपूर्णा येथील ढगा देवी यांच्या दर्शनाची संधी मिळणार आहे. या पॅकेजसाठी सामान्य प्रवाशांचे भाडे ४२३ असून, महिला व ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना २१२ इतके सवलतीचे दर आहेत.

या दोन्ही टुर्स सकाळी ८ वाजता जुने बसस्थानक, अकोला आगार क्रमांक १ टॉवर चौक येथून सुरू होतात. भाविकांनी प्रवासाच्या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेऊन सकाळी १० ते संध्या. ५ या वेळेत आगाऊ आरक्षण करून ठेवावे, असे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे. यात्रेच्या बसेस या एसटीच्या नियमित बसप्रमाणेच असून, महिला व ज्येष्ठ नागरिकांना सामान्य दरातील सवलती यामध्येही लागू आहेत. त्यामुळे ही सेवा केवळ परवडणारीच नव्हे तर सर्वसमावेशकही ठरत आहे.

या टुर्सना विशेषतः महिला वर्गाकडून मोठा प्रतिसाद मिळत असून, अर्ध्या भाड्यात शक्तीपीठांचे दर्शन घेता येत असल्याने महिला भाविक मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी होत आहेत. पूजाअर्चा, उपासना व देवींचे दर्शन यासाठी नवरात्र ही सर्वोत्तम संधी मानली जाते. त्यामुळे महिलांनी या टुर्सचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.

धर्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचे सुंदर मिश्रण एसटी महामंडळाचा हा उपक्रम केवळ वाहतूक सेवा पुरवण्यापुरता मर्यादित नसून, यातून सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक भावना यांचाही सुंदर संगम घडतो आहे.

### पातूर तालुक्यात पत्नीच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून

## पतीकडून मारहाण-पत्नीचा मृत्यू,एक जखमी

■पातुर,दि २५ (प्रतिनिधी) :

तालुक्यातील कोसगाव येथे काल (दि. २३ सप्टेंबर) सायंकाळी भीषण घटना घडली. अनैतिक संबंधांच्या संशयावरून पतीने पत्नी व तिच्या साथीदारावर लाकडी काठीने जबर मारहाण केली. यात पत्नीचा मृत्यू झाला तर दुसरा इसम गंभीर जखमी झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कोसगाव येथील रहिवासी देविदास श्रीराम डाखोरे हे आपल्या शेतातून घरी परतले असता त्यांना त्यांच्या पत्नी शोभा डाखोरे हिच्यासोबत गावातील राजेश रामकृष्ण करवते हा अर्धनग्न अवस्थेत आपत्तीजनक परिस्थितीत दिसून आला.

रागाच्या भरात देविदास यांनी लाकडी काठीने पत्नी शोभा व राजेश करवते यांना जबर मारहाण केली. यात राजेश करवते गंभीर जखमी होऊन दवाखान्यात उपचार घेत आहेत. घटनेनंतर गंभीर जखमी झालेल्या शोभा डाखोरे यांना गावकऱ्यांच्या मदतीने दवाखान्यात नेण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी पातूर पोलिसांनी अप. क्र. २९०/२०२५ कलम १०३(१), ११८(१) भा.दं.स. नुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## सराफ बाजार नवदुर्गा उत्सव मंडळात यंदा शक्ती धामचा भक्तिमय देखावा

**अकोला** : गत ४६ वर्षापासून अनेक प्रबोधनात्मक देखावे साकार करणाऱ्या सराफ बाजार परिसरातील सराफ बाजार नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने यंदा महानगरात साकारत असलेल्या शक्ति धाम चा देखावा निर्माण करण्यात आला असून यात श्री जीणमाता,श्री शाकंभरी माता व श्री महालक्ष्मी चा दरबार सजविण्यात आला आहे.ही झाकी मूर्तिकार अतुल मोरवाल,योगेश मोरवाल यांनी तयार केली आहे. या संपूर्ण परिसरात अमीन भाई यांनी विद्युत व्यवस्था केली असून मंडप सजावटीचे कार्य रोहीत ईचे यांनी



सुरेखपणे केले आहे. मंडळाच्या वतीने नवरात्रात अनेक उपक्रम आयोजित केले असून यात शनिवार दि २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता संध्या पसारी यांच्या जीण माता मंडळाच्या वतीने भव्य संगीतमय उत्सव होणार असून रात्री ८ वाजता माहेश्वरी सुंदरकांड समितीच्या वतीने १२२७ वा भव्य सुंदरकांड सोहळा आहे. रविवार दि २८ सप्टेंबर रोजी दु ३ वाजता शाकंभरी मातेचा भव्य मंगलपाठ होणार आहे.मंगळवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी मातेचा ५६ भोग दर्शन सोहळा होणार असून दिनांक ३ ऑक्टोबर रोजी मातेचे ढोल ताशांच्या गजरात मोठ्या भक्ती भावात विसर्जन करण्यात येणार आहे.दिनांक ३ ऑक्टोंबर पर्यंत नित्य सुरू असणाऱ्या या माता दर्शन उत्सवात भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### जनावरे चोरीतील आरोपीला अटक



**अकोला** : २२ ऑगस्ट रोजी सकाळी आर. आर. फिटनेस जिम जवळ पखाले यांचे घराजवळ खुल्या जागेमध्ये फिर्यादीने बांधलेली जनावरे एका वाहनात टाकून चोरली होती. खदान पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला अटक केली. तसेच वाहनासह अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त केला.एका पांढऱ्या रंगाच्या वाहनामधे दोन तीन अज्ञात इसमांनी ज्यामध्ये चोरून नेली होती. फिर्यादी च्या तक्रारी वरून खदान पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. गुन्हयाचा तपास करीत असताना मिळालेल्या माहितीनुसार आरोपी अब्दुल जब्बार अब्दुल कादर वय २५ वर्षे रा. मच्छी मार्केट ताजनापेठ ह.मु. फिरदोस कॉलनी मदीना पानटपरी जवळ रामदासपेठ अकोला यास अटक केली.चोरी संबंधित सखोल चौकशी केली असता आरोपीने साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीच्या ताब्यातून गोवंश विक्रीतुन मिळालेले १०,००० /- रूपये, एक पांढऱ्या रंगाची होन्डा एक्सेंट कार असा २,६०,०००/- रूपया चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. खदान पोलिस स्टेशन चे निरीक्षक मनोज केदारे यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल अमित दुबे, निलेश खंडारे, गिरीधर विर, अभिमन्यू सदाशिव, वैभव कस्तुरे यांनी कारवाई केली.

### एमआयडीसी ठाणेदारपदी राहुल जंजाळ

**अकोला** :एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रकाश झोडगे यांची बाळापूर पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकपदी बदली करण्यात आली असून, त्यांच्या रिक्त जागेवर रामदासपेठ पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेले दुय्यम अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक राहुल जंजाळ यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी सोमवारी एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या पदभार ठाणेदारपदाचा स्वीकारला आहे. तसेच बाळापूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनिल जुमळे यांची पोलिस नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली

## मजलापुर ते म्हैसांग शिवदांड रस्त्याबाबत खुलासा

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

मजलापुर ते मैसांग शिवदांड रस्त्याबाबत काही माध्यमांतून बातम्या प्रसारित झाल्या आहेत. त्याचा खुलासा तहसीलदार सुरेश कव्हळे यांनी केला आहे. म्हैसांग येथील गुलाब प्रल्हादराव लव्हाळे व इतर यांनी दिनांक १५ सप्टेंबर रोजी मजलापुर ते म्हैसांग शिवदांड रस्ता मोकळा करण्याबाबत अर्ज सादर केला. अर्जामध्ये नमूद केल्यानुसार, गटधारक शेतकऱ्यांची शेती शिवदांडाच्या उत्तर बाजूला आहे. त्यामुळे आमचा रस्ता बंद झाला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने गैरअर्जदार यांना नोटीस काढून दि. १९ सप्टेंबर रोजी सुनावणीसाठी बोलावले. म्हैसांग येथील चार अर्जदार त्यावेळी हजर होते, तसेच मजलापुर येथील गैरअर्जदारही हजर होते. त्यांच्या जबाब मध्ये शेताच्या बाजूने म्हैसांग शिवदांड रस्ता ३३ फुटाचा असल्याचे कागदोपत्री नमूद आहे. मात्र, शेत रस्त्यावर खूप मोठा पाऊस झाल्याने पाणी साचले आहे त्या पाण्यामधून ये- जा करण्यास त्रास होत आहे. तरी तेहतीस फुटी रस्ता मोजणी करून द्यावा व आम्ही शेतकरी स्वखर्चातून साचलेले पाणी ज्या बाजूला थांबले आहे, त्या शेताच्या भागात नाली तयार करून म्हैसांग मेन रोड कडेने पाणी काढून देण्यास तयार आहोत.

जर रस्ता तयार करण्यासाठी लोक वर्गणी करणे आवश्यक असेल त्यालाही व नाली रस्त्याकडे काढण्यास तयारी दर्शवण्यात आली. शेत रस्त्यासाठी भविष्यात कुठलीही अडचण येणार नाही व ज्यांना मंजूर नाही त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी, असे नमूद करण्यात आले.याप्रकरणी अर्जदार यांचे म्हणणे मांडण्यासाठी दिनांक २६ सप्टेंबर ही तारीख ठेवण्यात आली आहे.

## कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांच्या विविध मागण्या मंजूर असूनही कार्यान्वित न केल्याने नाराजी

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत मंजूर असलेली कामे स्वतंत्र यंत्रणेद्वारे करण्याचे उच्च न्यायालय व शासन निर्णयांनुसार निर्देश असतानाही जिल्हा परिषद यंत्रणेकडेच जबाबदारी ढकलली जात असल्याचा गंभीर आरोप कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांनी केला आहे.

सदर अभियंता संघटनेतर्फे जिल्हा परिषदेत निवेदन सादर करून नाराजी व्यक्त करण्यात आली. यामध्ये त्यांनी स्पष्ट केले की, मनुष्यबळाचा तीव्र अभाव असतानाही



जिल्हा परिषद यंत्रणेला कामांचा प्रचंड भार टाकला जात आहे. यामुळे मंजूर कामे वेळेत पूर्ण न होता कामकाज ठप्प पडत असून, ग्रामीण विकासाच्या गतीवर परिणाम होत आहे.मग्रारोहयो अधिनियम २००५ नुसार ग्रामपंचायतीमार्फत मजुरांना काम उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी तांत्रिक सहाय्यक व रोजगार सेवकांची स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करण्यात आलेली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासनाच्या प्रतिज्ञापत्रानुसारही ही कामे संबंधित मंजूर यंत्रणेकडूनच होणे अपेक्षित आहे.

## मनपात पंडीत दीनदयाल उपाध्याय जयंती साजरी



■अकोला,दि १६ (प्रतिनिधी) :

. २५ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यपरांच्या हस्ते पंडीत दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.यावेळी मंगेश जाधव, सी.देशपांडे, अनिल अघडते, गजानन काकड, दिपक शिरसाट, अनिता इंगळे, सरलता पोटे, सुकन्या साबळे, वनिता हुसे, प्रिती चंदनबटवे, जयश्री वानखडे, मेघा शेगोकार, मनुताई घाटोळे, सुवर्णा शिरसाट, ज्योति आवटे व ईतर कर्मचा-यांची उपस्थिती होती.

### आयजीनी घेतली पोलिस अधिकाऱ्याची बैठक

**अकोला** :दुर्गाउत्सवाचा बंदोबस्त आणि जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी अमरावती परिमंडळाचे महानिरीक्षक रामदास पोकळे हे बुधवारी अकोल्यात दाखल झाले. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात त्यांनी जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमवेत जम्बो बैठक घेऊन आवश्यक ते विशेष पोलीस दिशानिर्देश दिले. बैठकीत त्यांनी गंभीर गुन्ह्यांचा तपास, वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण आणि दुर्गाउत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलावी.

## शिवारफेरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळाली आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेतर्गत पाणलोट अंतर्गत डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आयोजीत खरीप शिवारफेरीत बाळापूर तालुक्यातील बटवाडी खु,तामसी,चिंचोली,बटवाडी बू,पिंपळगाव येथील शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.या शिवारफेरी दरम्यान शेतकऱ्यांनी फळ,फूल व भाजीपाला लागवड तंत्रज्ञान,सेंद्रिय व नैसर्गिक शेती पद्धती,काढणीपश्चात तंत्रज्ञान,पिकांचे मूल्यवर्धन,कापूस संशोधन, गळीत धान्य प्रक्रिया,गांडूळ खत व व्हर्मीवॉश उत्पादन प्रकल्प, साहिवाल गो संवर्धन प्रकल्प, भाजी, फुले,फळ आदि माहिती मिळाली.

## मनपाद्वारा "एक दिवस, एक तास, एक साथ" अंतर्गत विशेष स्वच्छता मोहीमेचे आयोजन

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच उपस्थितीत "एक दिवस, एक तास, एक साथ" अंतर्गत आज दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी विशेष स्वच्छता मोहीमे अंतर्गत अकोला महानगरपालिका क्षेत्राम ध्ये झोन निहाय विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. यामध्ये पुर्व झोन अंतर्गत नवीन बस स्थानक समोरील भाग, गांधी जवाहर बाग व त्या लगतचा परिसर, ईरानी वस्ती, तसेच पश्चिम झोन अंतर्गत असदगढ किल्ला जवळ, पोळा चौक, उत्तर झोन अंतर्गत मंगला होटेल चौक ते मनपा आयुर्वेदिक दवाखाना, आकोट रोड तसेच दक्षिण झोन अंतर्गत दक्षिण झोन कार्यालय समोरील निरंकारी भवन ते महावितरण कार्यालय, गौरक्षण रोड पर्यंतच्या परिसराची मनपातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याव्दारे स्वच्छता




करण्यात आली आहे. शहरातील प्रत्येक सामाजिक संघटना तसेच प्रत्येक नागरिकनी आप-आपला परिसर स्वच्छ ठेवला तसेच आपल्या घरात व प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून परिसरात ईतरत्र न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकून आणि शासनाने बंदी घातलेल्या एकल वापर प्लास्टीकने बनलेल्या वस्तुंचा वापर पुर्णपणे बंद करुन आपले शहर स्वच्छ व सुंदर बनविण्याच्या कामामध्ये सहकार्य करावे असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यावेळी केले आहे. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने, शहर अभियंता नीला वंजारी, मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, सहा.आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, पश्चिम झोन क्षेत्रीय अधिकारी गजानन घोंगे यांचेसह मनपा अंतर्गत असलेल्या सर्व विभागांचे विभाग प्रमुख व कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## शासनाच्या राज्यस्तरीय गणेशोत्सव स्पर्धेत मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळास मिळाले द्वितीय स्थान

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

गत ८९ वर्षांपासून उत्कृष्ट मानवीय सेवा व अदभूत व प्रबोधनात्मक देखावे निर्माण करून गर्दीच्या उच्चाकात प्रथम असणाऱ्या स्थानीय मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२५ चा जिल्हास्तरीय गटातील द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. अनेक मानांकन प्राप्त असणाऱ्या या गणेशोत्सव मंडळास राज्यातील शासनाचा हा मानाचा पुरस्कार मिळाला असून शासकीय कार्यक्रमात लवकरच मंडळास पारितोषिक प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक, ब्रजेश तापडिया, अध्यक्ष नितीन चांडक, सचिव जतिन राठी आदींनी यावर्षी गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर व पर्यटन झाकी, शिवकालीन कार्यक्रमावर आधारित झांकीसाकार केली होती.शासनाच्या परीक्षण समितीने जिल्ह्यातील समस्त सार्वजनिक गणेश मंडळाच्या झाक्या, देखाव्याचे परीक्षण करून आपला स्पर्धा अहवाल शासनाच पाठविला होता. या स्पर्धेचा नुकताच निकाल घोषित होऊन यामध्ये मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाला जिल्हास्तरीय गटातून द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. निकाल प्राप्त



होताच मंडळाच्या समस्त कार्यकर्त्यांनी मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक,ब्रजेश तापडिया यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा बहाल केल्यात. या उत्सवाच्या सफलते साठी मंडळाचे सचिन चांडक, शैलेंद्र तिवारी, पंकज तापडीया, भूपेंद्र तिवारी, आशिष राठी, गोविंद लड्डा, अमित भुतडा, अनिल तापडीया, प्रशांत चांडक, पलक तिवारी, दिवेश शहा, राजू तायडे, संकेत चांडक, गौरव चांडक, आदिनी मेहतन घेतली.


# अखेर ११व्या दिवशी ओबीसी समाजाचे आमरण उपोषण आक्रोश सभा नंतर स्थगित

## माजी मंत्री सुधाकर गणगणे यांच्याहस्ते ज्यूस पिऊन दिली स्थगिती



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
महाराष्ट्र राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, अकोला येथील ओबीसी समाजाने तीव्र आंदोलन सुरू केले आहे. ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करण्यासाठी १५ सप्टेंबरपासून पाच प्रतिनिधींनी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते .या उपोषणाला जिल्हाभरातून पाठींबा मिळत असल्यामुळे तब्बल १० दिवस हे आंदोलन चालले अखेर कायदेशीर लढाई लढण्यासाठी समाज जागृत झाला असून माजी मंत्री सुधाकर गणगणे यांच्या हस्ते त्या चारही उपोषणकर्त्यांना ज्यूस देऊन उपोषण स्थगित केले.जनार्दन हिरळकर, शंकर बापूराव पारेकर, पुष्पाताई गुलवाडे, राजेश माणिकराव ढोमणे आणि ॲड. भाऊसाहेब विठ्ठलराव मेडशिकर.यांनी मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात प्रवेश देण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करणे. यासाठी उपोषण सुरु केले होते.त्यांना विविध संघटना आणि गावागावांतून पाठिंब्याची पत्रे येत होते.आज ओबीसी समाजाने आक्रोश सभा आयोजित केली होती. या सभेनंतर माजी आमदार नारायण गव्हाणकर, माजी आमदार हरिदास भदे , विजयराव कोसल, प्रा डॉ संतोष हुशे, सुभाष सातव, सदाशिव शेळके, एड.प्रकाश दाते, प्रा विजय उजवणे, चंदू सावजी आदि उपस्थित होते.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी वापरली जाईल. प्रभाग रचना निश्चित झाली असून, आता आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमाची प्रतीक्षाआहे. मतदार यादीमध्ये नवीन नावे समाविष्ट करणे किंवा नावे वगळणे यासारख्या कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. हरकती व सूचना केवळ लेखनिकांच्या चुका, चुकीचा प्रभाग, किंवा विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे यासारख्या दुरुस्त्यांसाठी दाखल करता येतात.

## पातूर वनपरिक्षेत्राची मोठी कारवाई

# दोन चंदन तस्कर रंगेहाथ पकडले

■पातुर,दि २५ (प्रतिनिधी) :
पातूर वनपरिक्षेत्रातील राखीव वनात चंदनाची अवैध वृक्षतोड करणाऱ्या दोन आरोपींना वनविभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास चिंचखेड भाग-१ नियतक्षेत्रातील राखीव वन कक्ष क्रमांक ६९ मध्ये करण्यात आली. दोन्ही आरोपींना अटक करून न्यायालयासह हजर केले असता तीन दिवसाची वनकोठडी न्यायालयाने सुनावली आहे.

चंदनाची वृक्षतोड करणाऱ्याशेख अफसर शेख शरीफ (वय ६५) आणि सैय्यद अली सैय्यद चांद (वय ५४), दोघेही रा. मुजावरपुरा, पातूर जिल्हा अकोला अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.वनविभागाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, वन कर्मचाऱ्यांचे पथक चिंचखेड राखीव वनात गस्त करत असताना दोन इसम कुऱ्हाडीच्या साहाय्याने चंदनाच्या झाडाची तोड करत असल्याचे निदर्शनास आले. वन कर्मचाऱ्यांची चाहूल लागताच आरोपींनी मुद्देमाल व हत्यारे फेकून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु वन विभागाच्या पथकाने पाठलाग करून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून अंदाजे ५.३७० किलो चंदनाचे लाकूड (९६६ ग्रॅम गाभा व ४४०४ ग्रॅम सालसहित) जप्त करण्यात आले



आहे.आरोपीविरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१-अ), २६(१) (फ) अन्वये वन गुन्हा क्रमांक १५१८/१८/२०२५ दाखल करण्यात आला असून आरोपीना न्यायालयासमोर हजर केले असता पुढील तपासाकरिता न्यायालयाने ३ दिवसांची वनकोठडी मंजूर केली आहे. पुढील तपास जे. आर. माळोदे, वनपाल बोडखा हे करीत आहेत. सदर कारवाई सुमंत सोळंके, उपवनसंरक्षक (प्रा.), अकोला वनविभाग, अकोला, कु. नमता ताले, सहायक वनसंरक्षक (वने), अकोला व श्रीनिवास गव्हाणे, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), पातूर, यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल श्री. जे. आर. माळोदे आणि वनरक्षक श्री. बी. व्ही. थोरात यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## मनपा इमारतीच्या तांत्रिक सल्लागार निवडीसाठी पाच निविदा

**अकोला :** महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकाम प्रकल्पाला गती देण्यासाठी प्रशासनाने तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्तीसाठी निविदा मागवल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला असून, एकूण पाच कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. यामुळे लवकरच नवीन इमारतीच्या बांधकामाचे काम सुरू होण्याची शक्यता आहे. महापालिकेला नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी नझुल शिट क्रमांक ५५, नझुल भूखंड क्रमांक ११-१ मधील २५.५६७ चौरस मीटर जागेचा ताबा यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. सुरुवातीला या कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता, मात्र आता शासनाने तब्बल १०० कोटी रुपयांचा निधी मंजूरमहानगरपकोला :महापालिका जनहित सर्वतोपरी केला आहे. या मोठ्या निधीमुळे प्रशासनाने तांत्रिक सल्लागार नेमण्याचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या पाच निविदांची छाननी करून, त्यापैकी पात्र कंपनीची निवड केली जाईल. तांत्रिक सल्लागार नियुक्त झाल्यानंतर इमारतीचे डिझाइन आणि आराखडा तयार केला जाईल. त्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामासाठी निविदा

# राष्ट्रवादी महिला काँग्रेसची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
शासकीय विश्रामगृह अकोला येथे महिलांची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी महिला जिल्हाध्यक्षा प्रतिभा अवचार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार,प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे व महिला प्रदेशाध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर यांच्या मान्यतेने अकोला जिल्हा महिला राष्ट्रवादी पार्टीची जिल्हा कार्यकारिणी आमदार अमोलदादा मिटकरी यांच्या मार्गदर्शनात व उपस्थित घोषित करण्यात आली..

यावेळी प्रदेश पदाधिकारी संध्याताई वाघोडे,छायाताई कात्रे,युवक जिल्हाध्यक्ष अमोल काळणे,जिल्हा सचिव सुषमाताई राठोड,विद्यार्थी अध्यक्ष अदनान ,सामाजिक न्याय अध्यक्ष प्रकाश खाडे,बाटा शहर अध्यक्ष रिजवान बाबा,कार्यालयीन सचिव किशोर तेलगोटे,देविदास गावंडे,हरिदास बरिंगे. आदी उपस्थित होते.यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा सौ प्रतिभाताई अवचार यांनी केले. यावेळी सर्व मान्यवरांची भाषणे झाली.महिला जिल्हा कार्यकारिणी पुढील प्रमाणे..जिल्हा अध्यक्षा प्रतिभा प्रभाकर अवचार,जिल्हा उपाध्यक्षा..श्रीमती कल्याणी अनिलराव सोनोने,लिलाबाई देविदास गावंडे,आशा गोपाळ शिंदे,शारदा कैलास थोटे,सुनंदाताई नवघरे,म हासचिव शितल अभयराव भुस्कूडे,कोषाध्यक्ष ज्योती



वाहोकार,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख निशा स्वप्नील ठाकरे,सचिव..मनिषा गोपाळ राऊत,मंजूषा सुनिल देशमुख,शुभांगी प्रविण तायडे,रंजना रविंद्र सिरसाट,शिवानी रितेश अग्रवाल,विद्या वामनराव चव्हाण,निर्मला तुळशीराम भोपळे,शारदा कुंदन सिरसाट,शिल्पा उमेश देशमुख,संघटन सचिव वर्षा गोपाळ मावलकर,सहसचिव..यमुना रमेश टेकाम,लिलाबाई श्रीकृष्ण महानकर,अनिता दिपक सपकाळ,कल्पना हरिभाऊ बिडवे,रेखा सत्तुजी गवई,शिला दिपक वानखडे,रुपाली हरिदास धनोकार,सुनिता महेंद्र ठोंबरे,कार्यकारीनी..सदस्य बयाबाई देवराव मांडोकार,राजकन्या श्रीराम वानखडे,शिला सुरेश आठवले,शितल अरविंद जंजाळ,रुपाली प्रम ोद वानखडे,अंजू राजेंद्र तेलगोटे.तालुका अध्यक्ष.. अकोला जयाताई राजू खराटे,मुर्तिजापुर आरती अमर ठाकरे,बाळापुर मुक्ता पंजाबसिंग पवार,तेल्हारा सुमित्रा हरिदास बरिंगे,अकोट शितल डिगांबर शेंडे,पातुर उमाताई रामकृष्ण महल्ले,बार्शिटाकळी संगिता संतोष वैराळेकार्यक्रम ाचे संचलन रेणुका तायडे.आभार उमा महल्ले यांनी केले.

## निक्षय मित्र श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव तर्फे १३ क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप



■मुंडगाव,दि २५ (प्रतिनिधी) :
राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय अकोला प्रा.आरोग्य केंद्र मुंडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव यांनी निक्षय मित्र बनून १३ क्षयरुग्णांना दोन महिन्याकरिता आहार किटचे वाटप करण्यात आले.

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्र हा उपक्रम सुरू असून यामध्ये क्षय रुग्णांना सामुदायिक सहाय्य हा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा एक प्रमुख उपक्रम आहे. ज्याच्या द्वारे रुग्णांना अतिरिक्त साह्यय मिळावे, यासाठी श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव द्वारे १३ क्षय रुग्णांना दत्तक घेऊन दोन महिन्यांच्या २६ पोषण आहार किट वाटप करण्यात आली. यात गहू, तुरीची डाळ शेंगदाणे गोड तेल यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाकरिता डॉ. श्वेता चव्हाण वैद्यकीय अधिकारी क्षयरोग आरोग्यकेंद्र अकोला डॉ.शारदा भिरडे वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मुंडगाव, श्री गजानन महाराज पादुका संस्थान मुंडगाव चे अध्यक्ष विलास बहादुरे कोषाध्यक्ष विजय ढोरे, विश्वस्त राजेश खोकले, वआर बी नागरे आरोग्य सहाय्यक, तालुका आरोग्य सहाय्यक छगन अंबळकार, कपिल होळकर, वसंत उन्हाळे, गणेश राठोड,संतोष आठवले आरोग्य सेविका लता अंभोरे, उज्वला साळवे, गटप्रवर्तक वैशाली नाथे, संगीता सरकटे व मुंडगावातील आशा सेविका हजर होत्या. कार्यक्रम यशस्वी ते करिता पादुका संस्थानचे कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व व इंग्लिश एक्सटेम्परी स्पर्धा संपन्न



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. अकोला, महाराष्ट्र इंग्लिश टीचर्स असोसिएशन आणि श्री शिवाजी विद्यालय टाऊन ब्रांच, हरिहर पेठ अकोला यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विद्यार्थ्यांसाठीची जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आणि इंग्लिश एक्सटेम्परी स्पर्धा स्थानिक श्री शिवाजी विद्यालय टाऊन ब्रांच येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. मराठी व उर्दू माध्यमा करिता आधी ठरवून दिलेल्या विषयावर इंग्रजी भाषण स्पर्धा आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांकरिता पूर्वतयारी न करता वेळेवर दिलेल्या विषयावर भाषण स्पर्धा असे या उपक्रमाचे स्वरूप होते. इयत्ता सहा ते आठ चा गट अ आणि इयत्ता ९ व दहावीचा गट ब असे दोन गट होते. या आधीच्या तालुकास्तरीय फेरीतील प्रत्येक तालुक्यातील पहिल्या क्रमांकाचे विजयी स्पर्धक स्पर्धे ला उपस्थित होते.

## एल.आर.टी. महाविद्यालयाच्या एन.सी.सी. कॅडेट्सची सी.ए.टी.सी. कॅम्पमध्ये १० मेडल्स मिळवत उज्ज्वल कामगिरी

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
११ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियन अकोला येथे दि. १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत सी.ए.टी.सी. ११३ कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते. बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल व्ही. एम. शुक्ला यांच्या नेतृत्वामध्ये या कॅम्पमध्ये ११ महाराष्ट्र बटालियन मध्ये मोडणाऱ्या १२ शाळा व १० कॉलेजचे एकूण ४४३ एन.सी.सी. कॅडेट्सनी सहभाग घेतला होता. १० दिवस चाललेल्या या कॅम्प दरम्यान कॅडेटला नेतृत्व, अब्स्टकल, फायरिंग, ड्रिल तसेच त्यांच्या कलागुणांना चालना विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या कॅडेट्सला देण्यात आल्या. तसेच वेगवेगळ्या स्पर्धाचे आयोजन सुद्धा या ठिकाणी करण्यात आले. यामध्ये श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील एन.सी. सी. यूनिटच्या एकूण ३१ कॅडेट्सनी प्रत्येक




उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन अनेक स्पर्धेमध्ये उत्तम रित्या प्रदर्शन करून १० मेडल प्राप्त केले. या कॅम्पमध्ये कॅडेट सुरज ठोसर, कॅडेट आयुष कुलकर्णी, कॅडेट प्रथमेश वसतकार, कॅडेट वैभव डाखोळे, कॅडेट ओम चोपडे, कॅडेट कृष्णा ठाकूर, कॅडेट सत्यम टोंगले, कॅडेट विधान तिवारी, कॅडेट धनराज जाहिर, कॅडेट शिवम वाघ,कॉर्पोरल तन्वी मालगन, कॅडेट आरती कोंडेकर, कॅडेट मानसी दळवी, कॉर्पोरल पल्लवी शिरसाट, कॅडेट जानवी पारसकर, कॅडेट तृष्णा सिंह, कॅडेट प्रांजल लांडगे, कॅडेट तृप्ती कोरडे,खंडागळे, कॅडेट प्राजक्ता मोगरे, कॅडेट अनुजा देशपांडे इत्यादी कॅडेट्सने सहभाग घेतला होता.

## अकोला रेल्वे स्थानकावर स्वच्छता ही सेवा' रॅली; प्रवाशांमध्ये जनजागृती




■अकोला,दि २५(प्रतिनिधी) :
'स्वच्छता ही सेवा - २०२५' या अभियानांतर्गत, अकोला रेल्वे स्थानकावर आज स्वच्छता जनजागृतीसाठी एक रॅली काढण्यात आली. या रॅलीचा मुख्य उद्देश प्रवाशांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.या रॅलीमध्ये रेल्वेच्या विविध विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यामध्ये स्टेशन प्रबंधक श्री. संतोष कवडे, हॉस्पिटलच्या डॉक्टर कु. स्नेहल डोंगरे व त्यांचा स्टाफ, आरोग्य निरीक्षक श्री. शिवकुमार माली, वाणिज्य निरीक्षक श्री. राऊत आणि निकम, तसेच आरपीएफ निरीक्षक श्री. रजनीकांत व त्यांचा स्टाफ यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, ऑन ड्युटी टीसी श्री. सेठिया, सौ. मलिये, कार्यालय प्रमुख श्री. पालवे, वरिष्ठ बाबू या अभियानात सहभागी झाले होते.

**चौकशीची जाहिर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग,अकोला.**

**अर्ज क्रमांक :-१०५/२०२५ कलम -१९** जा.क्र.२७४५ /२५, दिनांक : २२/०९/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव- **श्री. संत सावता माळी चॅरिटेबल ट्रस्ट,** हातगाव ता.मुर्तीजापूर जि. अकोला **अर्जदार :- श्री. आशिष रामदासराव, निलखन** रा. सुदर्शन कॉलोनी, हातगाव ता. मुर्तीजापूर जि. अकोला.सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळिवण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?(अ) जंगम मिळकत (वर्णन):- **रुपये-९००/-** अध्यक्षांच्या ताब्यात आहे.(आ) स्थावर मिळकत (वर्णन) **काही नाही.** सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेलल्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कया नीशी आज दिनांक १९/०९/२०२५ रोजी दिली.

(शिक्का)

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अकोला विभाग अकोला**

# शेतातील फवारणीमुळे अनेकांच्या डोळ्यांना त्रास

- विषारी केमिकल्स मुळे डोळ्यातील बुबूळांची हानी
- दक्षता बाळगण्याचे नेत्ररोग तज्ञ डॉ. शिरीष थोरात यांचे आव्हान
- जिल्ह्यातील विविध डोळ्यांचे दवाखान्यात शेकडो पेशंट

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :
शेतकरी बांधव विविध संकटांशी सामना करीत असतानाच पुन्हा एक गंभीर संकट त्यांच्या समोर उभे झाले आहे. सध्या शेतात कपाशी, तूर, सोयाबीन आदी पिकांवर फवारणी सुरू आहे. या फवारणीमुळे बऱ्याच ठिकाणी फवारणी करणाऱ्यांसह इतरांनाही डोळ्याचा त्रास होऊ लागला आहे.

फवारणीच्या औषधांमधील विषारी केमिकल्स मुळे अनेकांच्या डोळ्यातील बुबुळांना हानी पोहोचू लागली आहे. हे सर्व प्रकार डोळ्यांसाठी अतिशय घातक असून फवारणी करणाऱ्यांसह शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांनी व इतरांनी सुद्धा दक्षता बाळगण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य नेत्र तज्ञ संघटनेचे अध्यक्ष तथा प्रख्यात नेत्ररोग तज्ञ डॉ. शिरीष थोरात यांनी केले आहे.

मागील दोन आठवड्यांपासून या फवारणी मुळे डोळ्यांना त्रास होऊ लागल्याने अनेक पेशंट डोळ्यांच्या रुग्णालयात येऊ लागले आहेत.



संपूर्ण जिल्ह्यातील विविध डोळ्यांच्या दवाखान्यात दररोज सुमारे २०० ते ३०० पेशंट डोळ्यांवर इलाज करण्यासाठी येत आहेत. फवारणी केल्यानंतर काहींना लगेच दोन तासात तर काहींना पुढील दोन दिवसांच्या कालावधीत हा त्रास होऊ लागला आहे.

डोळ्यात कचरा गेल्यासारखे वाटणे, डोळ्याची भयंकर आग होऊन त्यातून पाणी येणे ही या फवारणीनंतर जाणवणाऱ्या त्रासाची प्रारंभीची लक्षणे आहेत. अशी लक्षणे दिसतात संबंधितांनी तातडीने नेत्र तज्ञांचा सल्ला घेऊन औषधोपचार करावा असाही इशारा वजा सूचना डॉ. शिरीष थोरात यांनी दिला आहे.

अजून सुमारे एक महिना म्हणजे दसरा, दिवाळीपर्यंत या फवारण्या सुरू राहणार आहेत. दिवसेंदिवस अधिक पावरफुल फवारणी औषधे तयार झाली असल्यामुळे फवारणी करणाऱ्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. केवळ शेतात गेलेल्यांनीच नव्हे तर रस्त्यालगत असलेल्या व नुकतीच फवारणी झालेल्या शेतात जवळून गाडीने जात असताना वाहणाऱ्या वाऱ्यामुळे सुद्धा या औषधांचा घातक परिणाम डोळ्यावर होण्याची शक्यता आहे. काही औषधांमुळे तर शरीरास खाज सुटण्याचे प्रकार सुद्धा घडत आहेत. त्यामुळे फवारणी करणाऱ्यांनी पांढऱ्या काचांचा साईड बंद असलेला गॉगल तसेच चेहरा पूर्ण झाकलेला व उघड्या हाता पायांवर प्लास्टिकचे अथवा कापडाचे हात मोजे, पाय मोजे अवश्य घालावेत. जेणेकरून डोळ्यांचा बचाव होऊ शकेल. तसेच फवारणी संपताच तातडीने डोळ्यांसह हात पाय स्वच्छ धुण्यास प्राधान्य द्यावे. तसेच फवारणी च्या औषधांची विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांनी सुद्धा आपल्या दुकानात अशा प्रकारचे गॉगल्स तसेच सॉक्स विक्रीसाठी ठेवून फवारणी करताना कोणती काळजी घ्यावी याची माहिती देणारे एखादे पॉम्पलेट सोबत दिल्यास या प्रकारांना काही प्रम ाणात तरी आळा बसू शकेल. सोबतच प्रशासनाने सुद्धा कृषी सेवा केंद्रांना योग्य त्या सूचना द्याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

